## कृषी तंत्रज्ञान यंत्रणा (आत्मा) व्दारे दुध उत्पादक प्रशिक्षण :

प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांचे अधिनस्त असलेले जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालयामार्फत या योजनेंतर्गत कृषी तंत्रज्ञान यंत्रणा (आत्मा) व्दारे दुध उत्पादक प्रशिक्षण राबवली जाते. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना स्वच्छ दूध उत्पादन, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती व विक्री व्यवस्था, आधुनिक पध्दतीने दुधाळ जनावरांचे संगोपन, आजार व त्यावरील उपचार, एकात्मिक शेती विकास प्रकल्पाअंतर्गत आधुनिक शेती तंत्रज्ञान व वैरण विकास यासारख्या दूध उत्पादक शेतकऱ्यांशी निगडीत विषयांवर मार्गदर्शन करण्यात येते. या प्रशिक्षणकरीता जिल्ह्यातील जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

## घोषणा

१. **॥ दुभती गाया ज्या घरी । लक्ष्मी तेथे वास करी ॥**

२. **॥पशुंच्या आहारात खनिज मिश्रणाचा नियमीत वापर । दुग्धव्यवसायाची होई प्रगती निरंतर ॥**